# सगुणोपासना

## श्रीगुरूनृसिंहसरस्वतये नमः

दर गुरूवारी व जयन्तीच्या दिवशी मंदिराच्या आवारात श्रींची पालखी निघते. चार प्रदक्षिणा होतात. पहिल्या व चौथ्या प्रदक्षिणेच्या वेळी ठराविक पदे म्हणण्यात येतात. पालखीत श्रीदत्तात्रेय महाराजांची उत्सवमूर्ती ठेवण्यात येते. प्रदक्षिणेच्या वेळी पालखी पाच ठिकाणी थांबविण्यात येते. पाऊस वगैरे असल्यास सभामंडपातूनच पालखी फिरविण्यात येते.

जेथे पालखी थांबविण्यात येते ती पाच ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत –

१. मुख्य दरवाज्यासमोर ह्य श्रींच्यासमोरह्
२. औदुंबर काशीविश्वेश्वर व श्रींच्या पादुकांजवळ
३. श्रींच्या उजव्या बाजूस श्रीसिद्धिविनायकाजवळ
४. श्रींच्या डाव्या बाजूस श्रीनिर्गुणपादुकांजवळ
५. पुरातन वटवृक्षाजवळ ह्य श्रींच्या जन्मापासून असलेलाह्

अशा रीतीने प्रत्येक प्रदक्षिणेच्या वेळी पाच पदे म्हणण्यात येतात. याशिवाय श्रीपादश्रीवल्लभ, प.प.वासुदेवानंदसरस्वती व श्री.प.प. ब्रह्मनंदसरस्वतीस्वामी महाराजांच्या जयन्ती व पुण्यतिथीनिमित्त पालखी काढण्यात येते.

### प्रदक्षिणा पहिली

**पद १ ले**

उद्धवा शांतवन

शांत हो श्रीगुरूदत्ता । मम चित्ता शमवी आतां ॥ ध्रु ॥
तूं केवळ माता जनिता । सर्वथा तूंचि हितकर्ता ।
तूं आप्त स्वजन भ्राता । सर्वथा तूंचि त्राता ॥
**चाल..** भयकर्ता तूं भयहर्ता ।
दंडधर्ता तूं परिपाता ।
तुजवाचुनि न दुजी वार्ता ।
तूं आर्ता आश्रय दत्ता ॥ शांत हो ॥ १ ॥
अपराधास्तव गुरूनाथा । जरि दंडा धरिसि यथार्था ।
तरि आम्ही गाउनि गाथा । तव चरणीं नमवूं माथा ॥
**चाल ..** तूं तथापि दंडिसि देवा ।
कोणाचा मग करूं धावा ।
सोडविता दुसरा तेव्हां ।
कोण दत्ता आम्हा त्राता ॥ शांत हो ॥ २ ॥
तूं नटसा होउनि कोपी । दंडिताही आम्ही पापी ।
पुनरपिही चुकता तथापि । आम्हांवरि नच संतापी ॥
**चाल ..** गच्छतः स्खलनं क्वापी ।
असे मानुनि नच हो कोपी ।
निजकृपालेशा ओपी ।
आम्हांवरि तू भगवंता ॥ शांत हो ॥ ३ ॥
तव पदरि असता ताता । आडमार्गी पाउल पडता ।
सांभाळुनी मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ॥



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

चाल . . निज विरूदा आणुनि चित्ता ।
तूं पतित पावन दत्ता ।
वळे आतां आम्हावरता ।
करूणाघन तूं गुरूनाथा ।। शांत हो ।। ४ ।।
सहकुटुंव सहपरिवार । दास आम्ही हे घरदार ।
तव पदीं अर्पु संसार । संसाराहित हा भार ।।
चाल . . परिहरिसी करूणासिंधो ।
तू दीनानाथ सुवंधो ।
आम्हा अघलेश न वाधो ।
वासुदेव प्रार्थित दत्ता ।। शांत हो ।। ५ ।।

### पद २ रे

श्रीगुरूदत्ता जय भगवंता । ते मन निष्ठुर न करी आतां ।।ध्रु।।
चोरें व्दिजासी मारिता मन जे । कळवळले ते कळवळो आतां ।। श्रीगुरू ।।१।।
पोटशुळाने द्विज तडफडता । कळवळले ते कळवळो आतां ।। श्रीगुरू ।। २ ।।
व्दिजसुत मरता वळले ते मन । हो की उदासिन न वळे आता ।। श्रीगुरू ।। ३ ।।
सतिपति मरता काकुळती येता । वळले ते मन न वळे की आतां ।। श्रीगुरू ।। ४ ।।
श्रीगुरूदत्ता त्यजि निष्ठुरता । कोमल चित्त वाळवीही आता।। श्रीगुरू ।। ५ ।।

### पद ३ रे

जय करूणाघन निजजन जीवन । अनसूयानंदन पाहि जनार्दन ।। जय ।। ध्रु ।।
निज अपराधी अफराटी दृष्टी । होउनी पोटी भय धंरू पावन ।। जय ।। १ ।।
तू करूणाकर कधी आम्हांवर । रूससी न किंकर वरद कृपाघन ।। जय ।। २ ।।
वारी अपराध तूं मायवाप । तव मनीं कोप लेश न वामन ।। जय ।। ३ ।।
वालकापराधा गणे जरी माता । तरि कोण त्राता देईल जीवन।। जय ।। ४ ।।
प्रार्थी वासुदेव पदी ठेवी भाव । पदि ठेवी ठाव देव अत्रिनंदन ।। जय ।। ५ ।।

### पद ४ थे

धाव पाव दीनवंधु श्रीदत्त देवा ।। ध्रु ।।
कमंडलू माळ करी । डमरू त्रिशूळासि धरी । शंख चक्र भव हरी । द्यावी पायसेवा । धाव ।। १ ।।
त्रैमूर्ति विराजत । रसिकभाव भक्तहितअहं भाव जीवीं धरिता । वारिता जन्म मेवा । धाव ।। २ ।।
कलियुगीं भक्तप्रीति । होऊनि श्रीपाद यति । रक्षि नृसिंहसरस्वति । अर्पी प्रेम सेवा ।। धाव ।। ३ ।।
धूसर कांति दिव्य राज । विभूति अंगीं भव्य साज भक्तजना पूर्ण काज ी तूंचि गुप्त ठेवा ।। धाव ।। ४ ।।

### पद ५ वे

माझ्या दत्ता अवधूता ब्रम्हचारीहो । राहे साहे माहूरगडावरी । माझ्या ।।ध्रु ।।
प्रातःस्नाना येतसे भागीरथी माध्यान्हकाळीं जाये तो गोदेतटी ।। सायंकाळी स्वयंभू ज्याची मूर्ति ।। १ ।।
भक्षी करि र्कहाड कोल्हापुरी । येऊनि भक्ति रंकाळ तळयावरी । निद्रा करि अवधूत गिरीवरी ी माझ्या दत्ता ।। २ ।।
ऐसा दत्त दत्त हा योगी राणा । अनसूयेचे पोटी हो बाळ तान्हा । माधवदासासी नित्यदर्शन देइ। माझ्या दत्ता ।। ३ ।।

### पद ६ वे

माझी देवपुजा वा देवपुजा । पाय तुझे गुरूराया । माझी देव ।। ध्रु ।।
गुरूचरणाची माती । तेची माझी भागीरथी । माझी देव ।। १ ।।



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

गुरूचरणाचा विंदू । तोचि माझा क्षीरसिंधू । माझी देव ॥ २ ॥
गुरूचरणाचे ध्यान । तेची माझे संध्यास्नान । माझी देव ॥ ३ ॥
शिवदिनकेसरी पाही । सद्गुरूवाचुनि दैवत नाहीं । माझी देव ॥ ४ ॥

### पद ७ वे

श्रीगुरू औदुंवरीं । पाहिले नरहरि औदुंवरीं ॥ ध्रु ॥
दंड कमंडलु करी विराजित । मुख इंदूचे परि ॥ पाहिले ॥ १ ॥
धर्म रक्षण करावयास्तव । मानववपु आदरी ॥ पाहिले ॥ २ ॥
गंगाधरात्मज तत्पदकमलीं । लागला भ्रमरापरी ॥ पाहिले ॥ ३ ॥

### पद ८ वे

करंजापुरमध्ये नरसिंह सरस्वती दत्तची अवतरला ।
भक्तरक्षणासाठी प्रभुने अवतारचि धरिला ।
इति हा अवतारचि धरिला ॥ ध्रु ॥
पहा सुंदर मूर्ति मनोहर नरसिंह सरस्वती ।
साडे चारशे वर्षे लोटता झालि मना स्फूर्ती ।
मेवा मिठाई पायस केली करीतो सेवनाला ।
दत्त हा करितो सेवनाला । करंजापुरामध्ये ॥ १ ॥
पहा सुशोभित गुरूमंदिर शहरामध्ये आहे ।
करंजापुरच्या शहरामधे आहे ।
गुरूवारचे दिवशी पालखीत दत्त मिरविता आहे ।
महाशिवरात्री दिनी स्थापनी करूनी पादुकेला ।
गुरूच्या करूनी स्थापनेलाी करंजापुरामध्ये ॥ २ ॥
बह्मानंद सरस्वती गुरूने बोधची केला ।
भक्तिपुरःसर नारीनराला लाविले भजनाला ।
लीन होऊनी कृष्णा दासी । नमिते चरणाला ।
गुरूच्या नमिते चरणाला । करंजापुरामध्ये ॥ ३ ॥

### पद ९ वे

पालखीत स्वारी नेम गुरूवारी ।
आनंद दरबारी वर्णवे ना ॥ १ ॥
द्विजांचिये दाटी । वेद बोल होती ।
ल्याइलासे छाटी । दिगंबर ॥ २ ॥
रूद्राक्षाचे हार कस्तुरीचा टिळा ।
पाहता निज डोळा । निवतसे ॥ ३ ॥
जयजयकार नामा । करती वेळोवेळा ।
दुर्लभ सोहळा । ब्रह्मा दिका ॥ ४ ॥
दास म्हणे गुरू । घेई ही चाकरी । मोरचल करी । देई माझ्या ॥ ५ ॥

यापुढील पदे भजनीं मंडळींच्या इच्छेनुसार म्हणण्यात येतात .म्हणून ही पदे यात समाविष्ट केली आहेत . ती नित्य परिपाठातील नाहीत . एकूण दुर्स या प्रदक्षिणेची २ व तिर्स या प्रदक्षिणेची ५ अशी ७ पदे इच्छेनुसार म्हणण्यात येतात . नंतर चौथी प्रदक्षिणा सुरू होते . त्यातील पदे ठराविकच असतात .



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

### पद १० वे

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी । तारि तारि मजला ।
दयाळा तारि तारि मजला ।
श्रमलों मी या प्रपंचधामीं । आलों शरण तुला । तारि ॥ धु ॥
करिता आटाआटी प्रपंच अवघा । दिसते मिथ्यत्व ।
दयाळा दिसते मिथ्यत्व ।
म्हणवुनी भजन तुझे भजन वाटे । तारक सत्यत्व ॥ १ ॥
किंचिन्मात्र कृपा मजवरी जरी । करिशील उदार मन ।
दयाळा करशिल उदार मन ।
चुकलो मी या विषयसुखाच्या । आहारांतुन जाण ॥ २ ॥
कृष्णातटनिकटी जो विलसे । औदुंबर छायी ।
दयाळा कल्पतरू छायी ।
हंस परात्पर भारतिनायक । लीन तुझे पायीं ॥ ३ ॥

### पद ११ वे

दत्ता मजला प्रसन्न होसी जरि तूं वर देसी ।
तरि मी आन न मागे तुजशी निर्धारूनि मानसी ॥ धु ॥
स्मरण तुझे मज नित्य असावे तव गुण भावे गावे ।
अनासक्तिने मी वागावें ऐसें मन वळवावें ॥ १ ॥
सर्व इंद्रिये आणि मन हें तुझ्या हातीं आहे ।
यास्तव आतां तूं लवलाहे स्वपदीं मन रमवावें ॥ २ ॥
विवेक आणि सत्संगती हे नेत्रद्वय बा आहे
वासुदेवा निर्मल देहें जेणे त्वत्पदिं राहे ॥ ३ ॥ दत्ता ॥

<u>प्रदक्षिणा तिसरी</u>

॥ श्रीगुरू समर्थ ॥

## श्रीरंग अवधूत स्वामी विरचित
## श्री दत्त बावनी

### पद १२ वे

जय योगेश्वर दत्तदयाळ । तुज एका जगमा प्रतिपाळ ॥ १ ॥ अज्यनुसया करी निमित्त । प्रगटो जगकारण निश्चित ॥ २ ॥
ब्रह्माहरिहर नो अवतार । शरणागत तो तारणहार ॥ ३ ॥ अंतर्यामीं सत् चित् सुख ी बहार सद्गुरू द्विभुजसुमुख ॥ ४ ॥
झोळी अन्नपूर्णा कर माह्य। शांतीकमंडलू करसो हाय ॥ ५ ॥ क्यांय चतुर्भुज षड्भुज सार ी अनंतवाहू तूं निर्धार ॥ ६ ॥
आव्यो शरणे बाळ अजाण । उठ दिगंबर चाल्या प्राण ॥ ७ ॥ सुनी अर्जुन केरो साद । रिझ्यो पूर्वे तूं साक्षात ॥ ८ ॥
दिधी ऋद्धि सिद्धि अपार । अंते मुक्ति महापद सार ॥ ९ ॥ कीधो आजे केम विलंब । तुजाविणा मुजने ना आरव ॥ १० ॥
विष्णु शर्मद्विज तार्यो एम् । जम्यो श्राद्धमा देखो प्रेम॥ ११ ॥ जंभदैत्य श्री त्रास्या देव। कीधी म्हेरते त्या ततखेव ॥ १२ ॥
विस्तारी माया दिती सुत इंद्रकरे हणाल्यो तूर्त ॥ १३ ॥ एवो लीला कई यई शर्व । कीधो वर्णवे को ते सर्वज्ञ ॥ १४ ॥
दोडयो आयु सुतने काम । कीधो एने ते निष्काम ॥ १५ ॥ वोध्या यदुने परशुराम । साध्यदेव प्रल्हाद अकाम ॥ १६ ॥



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

एवी तारी कृपा अगाध । हतम्केम सुणे ना मारो साद ॥१७ ॥ दोड अन्त ना देख अनंत । माकर अधवच शिशुतो अंत ॥१८ ॥
जोई द्विजस्त्री केरो स्नेह । थयो पुत्र तुं निःसंदेह ॥ १९ ॥ स्मर्तृगामी कलितार कृपाळ । तार्यो धोबी छेक गमार ॥ २० ॥
पेट पीउथी तार्यो विप्र ॥ २१ ॥ करी केम ना मारोद्वार । जो आणि राम एकजवार ॥ २२ ॥
शुष्क काष्ठने आण्या पत्र । थयो केम उदासीन अस्त्रत्र ॥ २३ ॥ जर्जर वंध्या केरा स्वप्न । कीधा सफळ ते सुतनांकृत्सन ॥ २४ ॥
करी दुर ब्राह्मण नो कोढ । कीधा पुरण एना कोड ॥ २५ ॥ वंध्या भेस दुधवी देव । दारिद्रय ते ततखेव ॥ २६ ॥
झालर खाई रीझ्यो एम । दीधो सुवर्ण आघट सप्रेम ॥ २७ ॥ ब्राह्मण स्त्री नो मृत भर थार । कीधी संजीवन ते निधा र ॥ २८ ॥
पिशांच पिढा कीधी दूर । विप्र पुत्र उठाडय शूर ॥ २९ ॥ हरी विप्रमद् अंत्यज हाथ । रक्ष्यो भक्त त्रिविक्रमतात ॥ ३० ॥
निमिष मात्रे तंतुक एक । होंचाडयो श्री शैले देख ॥ ३१ ॥ एकी साथे आठ स्वरूप । धरी देव बहुरूप अरूप ॥ ३२ ॥
संतोष्या निज भक्त सुजात । आपी परचा ओ साक्षात ॥ ३३ ॥ यवत राजनी टाळी पीड । जात पातनी तमे न चीड ॥ ३४ ॥
रामकृष्ण रूपे ते एम । कीधी लीला ओ कई तेम ॥ ३५ ॥ तार्यो पथ्थर गणिका व्याथ । पशुपंखी पण तुजने॥ ३६ ॥
अधम ओधारण तारू नाम । गाता सरे न शां शां काम ॥ ३७ ॥ आधि व्याधी उपाधि सर्व । ठळे स्मरण मात्र थी शर्व ॥ ३८ ॥
मुठ चोट ना लागे जाण । पामे नर स्मरण निर्वाण ॥ ३९ ॥ डाकण शाकण भेसासुर । भूत पिशचि जंद असूर ॥ ४० ॥
लास मुठी देई ने तुर्त । दत्तधून साभांळता मूर्त ॥ ४१ ॥ करी धूप गाये जे एम । दत्त बावनी आ सप्रेम ॥ ४२ ॥
सुधरे तेना बने लोक । रहे न तेन क्या ये शोक ॥ ४३ ॥ दासो सिद्धितेनी धाय । दुःख दारिद्रय तेनां जाय ॥ ४४ ॥
बावन गुरूवारे नितनेम । करे पाठ बावन सप्रेम ॥ ४५ ॥ यथावकाशे नित्य नित्यम । तेने कदी न दंडे यम ॥ ४६॥
अनेक रूपे एज अभंग । भजता नडे न माया रंग ॥ ४७ ॥ सहस्त्र नामे नामी एक । दत्त दिगंवर असंग छेक ॥ ४८ ॥
वंदु तुजनें वारंवार । वेदश्वास तारा निर्धार ॥ ४९ ॥ थाके वर्णवनां ज्या शेष । कोण राक हू बहुकृतवेष ॥ ५० ॥
अनुभव तृप्तनो उदगार । सुणी हसे ते खाशे मार ॥ ५१ ॥ तपसी तत्त्वमसिए देव ी बोलो जय जय श्री गुरूदेव ॥ ५२ ॥

**अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त**

### पद १३ वे

पद १२ ते २० यापैकी कोणतीही ५ पदे म्हणतात
राग हमीर ताल त्रिवट चाल नमन नटवरा

नमन गुरूवरा गाणगवासा । भक्तहृदयसरकमलविलासा ॥ ध्रु ॥
जगत्पालका नरहरी देवा । अल्पवती तव व्हावी सेवा ॥
सर्व सुखांचा अससी ठेवा । जाणुनि गुण वर्णू निरंतर दासा ॥ १ ॥
विधि हरिहर शेषदिक अगणित । दमले करिता तव गुण सगुणित ।
मंदवुद्धि मी सुदयांकित तूंचि वदविता स्वयंप्रकाशा ॥ २ ॥

### पद १४ वे

आवडते जे दीनासी । हा न मोडि नरहरि संन्यासी ॥ध्रु ॥
वहुरूपी कारंज नगरी । भिक्षा करी घरोघरी ।
आठ ही ग्रामि गाणगापुरीं । काय अन्न न मिळे त्यासी ॥ १ ॥
आवडते . .
प्राशि वंध्यामहिषी पेय । घेवडयाच्या शेंगा खाय ।
ह्याला दैन्य आले काय । ऋद्धी सिद्धि ज्याच्या दासी ॥ २ ॥
आवडते . .
शिधा आणुनि अडिच शेर । भिक्षा करितो द्विजभास्कर ।
जेववीले अगणित नर । मान दिला वहुत त्यासी ॥ ३ ॥
आवडते . .



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

त्रिस्थळी गंगानुजाला । श्रीशैल्यही तंतीकाला ।
दावी भीमसुत पुत्राला । नित्य पाय वंदनासी ॥ ४ ॥
आवडते . .

**पद १५ वे**

श्रीविधिहरिहर मूर्ति सावळी कृष्णातिरि राहे । दत्तदिगंबर म्हणति जयाला औदुंबर छाये ॥ ध्रु ॥ कृष्णातिरिचा अगाध महिमा दुर्लभ देंवासी । हीचे तीरीं वास जयाचा अखंड हो काशी।। प्रातःकाळीं सुरगण मुनिजन येति स्नानासी। पवित्र होउन शुद्ध भक्तिने साधन मुक्तीसी। शुष्क पापें गणती नाहीं जाती विलयासी। महापापी करिता स्नानें जाती मोक्षासी।। चला जाउ या करा तयारी सत्वर लवलाहे ॥ १ ॥ श्रीविधि ॥
ध्यान पाहता भगवी वस्त्रें परिकर लंगोटी ॥ सर्वांगी चर्चुनी वैसली भस्माची उटी । दंडकमण्डलू करि घेउनिया उपवस्त्रें छाटी ।रूद्राक्षांचे हार प्रफुल्लित शोभति बहु कंठी । शमिपत्रे किती विल्व तुळसी सुमनांची दाटी । प्रेमानंदें भक्त वहाती आवड बहु मोठी । हास्यमुखानें कृपाकटाक्षें दासाकडे पाहे ॥ २ ॥ श्रीविधि ॥
औदुंबराची पूजा करिता कोटी पापांची राख रांगोळी होउनि जाते साक्ष अंबेची।अशा वृक्षातळीं बैसली स्वारी श्रीगुरूदत्ताची।तीन त्रिकाळीं पुजा होतसे श्रीगुरूरायांची। सायंकाळीं असे वाटते शोभा स्वर्गाची । मंत्रपुष्प अति घोष गर्जना चर्चा वेदांची । सीतारामा आला प्रेमा आनंद न समाये ॥ ३ ॥ श्रीविधि ॥

**पद १६ वे**

भावफुलांची माला ी अर्पिन माझ्या गुरूरायाला ॥ ध्रु ॥
देव्हा यामधे सुंदर मूर्ती । चित्तिं वसू दे ही त्रैमुर्ती ॥
स्फूर्ति चढू दे हरि भजनाला ॥ १ ॥ भाव . .
भक्तिचा तो धागा घेउनी । प्रेमाचि ती फुले वेचुनी ।
एक स्वरूपी मिळविन त्याला ॥ २ ॥ भाव . .
अज्ञानाची करूनी वात । ज्ञानाची उजळूनी ज्योत ।
प्रेमभरें मी पाहिन प्रभुला ॥ ३ ॥ भाव . .
तारा म्हणे हो सद्‌गुरूदेवा । सांभाळ माझा प्रभु तू करावा ।
अव्हेरूं नको तूं या लेकराला ॥ ४ ॥ भाव . .

**पद १७ वे**

आज नयनिं सिंहासनिं दत्तराज पाहिला ।
दत्तराज पाहिला कि स्वामिराज देखिला ॥ ध्रु ॥
देत अभय दृष्टि सदय़ भस्मभूषित सकल काय ।
मुकुटापरि वळवूनि शिरि । आवळोनि कुंतला ॥ आज . ॥ १ ॥
घालुनि दृढ पद्मासन । वल्कल परिधान करून ।
त्रिशूल हातिं धवलकांति वालमूर्ति शोभला ॥ आज ॥ २ ॥
शोभतसे दिव्य तिलक भाळीं मृगमद सुरेख ।
सस्मित मुख पाहुनिया़ प्रेमभाव दाटला ॥ आज ॥ ३ ॥
पाहताच रूचिर ध्याऩ हरूनि जाई देहभान ।
गुरूपदिं आनंद पूर्ण अनुसयेसी वाटला ॥ आज ॥ ४ ॥

**पद १८ वे**

भीमपलास, भैरवी



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

अनसूयेच्या धामी आले त्रैलोक्याचे स्वामी
विप्र होऊनि श्रीविधिहरिहर ी दारि पातले नसता मुनिवर ।
कळवळुनी ते मागती भोजन । साधुनी वेळ नामी ।। १ ।।
पाट मांडुनि अतिथी बसविले । " वस्त्र फेडुनी वाढी" वदले ।
भाव तयांचा तिने जाणिला अपुल्या अन्तर्यामी ।। २ ।।
विप्राज्ञेचे करिता पालन । नवल वर्तले एक विलक्षण ।
विप्र जाहली तिन्ही बाळे सती तयांची जननी ।। ३ ।।
सत्त्व पाहण्या दिव्य सतीचे । देव ठाकले भूवरि साचे ।
आत्मबलाची तिची अवस्था आलि तियेच्या कामी ।। ४ ।।

**पद १९ वे**

अवतरले गुरूराया । येथे श्रीगुरूमूर्ती नरसिंह सरस्वती अवतरले गुरूराया येथे अवतरले गुरूराया ।। धु ।।
बह्मानंदस्वामीने शोध लावले सद्गुरूसी येथे आणिले संतजनांचे पाय लागले भूमी शुद्ध कराया ।। १ ।।
सद्गुरूची अगाध लीलावांझ म्हशीला पान्हा फुटला वृद्ध स्त्रियेला पुत्रचि दिधला मति खुंटे वर्णाया ।।२ ।।
सद्गुरूचि कोमल मूर्ती सांज सकाळीं पूजा आरती.शंखोदकाची वाट पाहती सकल दोष हराया ।।३ ।।
श्रीगुरूची शुभद पाउले सेवेलागी जन आतुरले तारेने गुरूचरण वंदिले. करी कृपेची छाया ।।४ ।।

**पद २० वे**

मूर्ती तुझी हसरी

मोहक सुंदर नयनमनोहर मूर्ति तुझी हसरी ी गुरू रे ।। ध्रु ।।
माला कमडंलू छाटी भगवी पितांबर जरतारी ी गुरू रे ।। १ ।।
पायी खडावा जटाभार शिरी. भस्म विभूती धारी ी गोजरी ।। २ ।।
श्वान पुढे उभे धेनु पाठिशी. ब्रह्मा विष्णू त्रिपुरारी ी गुरू रे ।। ३ ।।
निराकार निर्गुण निर्विकारी सर्वांघटी भरली ी सगुणरूप ।। ४ ।।
गुरूमंदिरी साक्षात् वसली. पाहुनि भान हरी ीी रूप तुझे ।। ५ ।।
ध्यास लागला गुरूचरणाचा तारेच्या अंतरी गुरू रे दर्शन दे झडकरी ।। ६ ।।

**पद २१ वे**

औदुंबराचे गाणे

औदुंबरछायेखाली । वसे जो नित्य । श्रीगुरूदत्त बोला ी श्रीगुरूदत्त ।। धु ।।
ब्रह्मा. विष्णू आणि हर । आले पृथ्वीवरी ी सत्त्व पाहाया सतीचे । बनूनी वेषधारी ।
इच्छाभोजन तू देई। प तिव्रता नारी । तीन बाळे घेउनी अंकीं । सती दावी सत्य ।। १ ।।
बोला श्री गुरूदत्त ।।
अनसूया झाली माता । पिता बने अत्री । त्रयमूर्ती पाहुनी डोळा । प्रेमे डोले धरित्री ।
भक्त भाविकांच्या येती । आनंद अश्रू नेत्रीं । स्वर्गीचे देव रमले । सती सदानंद ।। २ ।।
बोला श्रीगुरूदत्त ।।
कलीयुगी अवतारूनी । जगा उद्धरसी । भक्त जनांच्या रक्षणा । प्रगट तू होसी ।
मागणे एक देवा । तुझ्या चरणाशी । ध्यानीं मनीं प्रेमलेच्या । राहो सद्गुरूनाथ ।। ३ ।।
बोला श्रीगुरूदत्त ।।



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

## प्रदक्षिणा चवथी

### पद २२ वे

पायघडी घाली । दत्ताची पालखी आली ॥ ध्रु०॥

ब्रह्मानंदस्वामिने मंत्रची दिधले । श्रोते भजनासी लाविले ।

पंचभूताचे सार काढिले । कायावस्त्र धून काढिले ।

जडिताची केली । दत्ताची पालखी आली ॥ १ ॥

नवरंगाचे पातळ लेवूनि । स्वकरें पायघडी घालोनि ।

त्रयमूर्ति चाले ज्याचे वरोनि ।

मौज पाहिली । दत्ताची पालखी आली ॥ २ ॥

मनकायेचा पितांबर । पायघडी दिसे बहु सुंदर ।

वर दत्त चालति दिगंबर ।

अनसुया माउली । दत्ताची पालखी आली ॥ ३ ॥

पाहते नरसिंह सरस्वती । पुढे उभी दत्ताची मूर्ति ।

मनुका वरते चरणावरति ।

लोटांगण घाली । दत्ताची पालखी आली ॥ ४ ॥

### पद २३ वे



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

भवतारका ह्या तुझ्या पादुका । घेईन मी माथां ।

करावी कृपा गुरूनाथा ॥ ध्रुo॥

अनिवार हे बहु मन माझे । चरणी स्थीर व्हावे ।

तव पदी भजनी लागवे । कामक्रोधादिक हे षड्रिपु समूळ छेदावे ।

हेची मागणे मला द्यावे । अघहरणा करी करूणा ।

दत्ता धाव पाव आता । करावी ॥ १ ॥

तूचि ब्रह्मा तूचि विष्णु तूचि उमाकांत । तूचि माझे सकळ दैवत ।

माता, पिता, बंधु सोयरा । तूचि सर्व गोत ।

तूचि माझे सकळ तीर्थ । तुजविण मी गा काहीच नेणे ।

तूचि कर्ता हर्ता । करावीo ॥ २ ॥

तन मन धन हे सर्व अर्पुनी । कुरवंडिन काया

उपेक्षू नका गुरूराया । कर्महीन मी मतीहीन मी

सकळ श्रम वाया । लज्जा राखा गुरूसदया ।

मातृ बालकापरी सांभाळी तूचि मुक्तिदाता । करावीo ॥ ३ ॥

शेषा ब्रह्मा वेदा न कळे । महिमा तुझा थोर ।

काय वर्णू मी पामर । वियोग नसावा तव चरणाचा ।



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

हाचि देई वर । शिरी ठेवी अभयकर ।

हीच विनंती दर्शन द्यावे । दास दिनानाथा ॥ करावी o ॥ ४ ॥

## पद २४ वे
## धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरूरायाची

झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ ध्रुo ॥ पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी । सर्वही तीर्थे घडली आम्हा आदि करूनि काशी ॥ १ ॥ मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती । नाम- संकीर्तने ब्रह्मानंदे नाचती ॥ २ ॥ कोटी ब्रह्महत्या हरती करिता दंडवत । लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायात ॥ क्त३ ॥ गुरूभजनाचा महिमा न कळे आगमा- निगमांसि । अनुभव ते जाणती जे गुरूपदीचे रहिवासी ॥ ४ ॥ प्रदक्षिणा करूनि देह भावे वाहिला । श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला ॥

## पद २५ वे

गुरूवर का रूसले । अजुनी कसे ते स्वस्थची वसले ॥ गुरूवर ॥ जिकडे तिकडे गोधंळ झाला । शांति मिळेना कुठे मनाला । दिसे उदासिन जग नयनाला । होईल तरी कैसे ॥ गुरूo॥ १ ॥ भक्तिभावना लुप्तचि झाल्या । उच्छृंखल मनोवृत्ती वनल्या ॥ भोगवासना बलाढय झाल्या । जन विषयी रतले ॥ गुरूo॥ २ ॥ काही सुचेना काही रूचेना । क्तसंत सज्जना मार्ग दिसेना । जगी विवरता होई कुंचबणा । धैर्य सर्व खचले ॥ गुरू o॥ ३ ॥ टाहो फोडुनि हाक मारितो । हरि भजनी जो सदा रंगतो । धीर तयाला सद्गुरू देतो । मानू नका खोटे ॥ गुरूo॥ ४ ॥ आत्मसुत म्हणे श्रीगुरूराया । आम्हि अपराधी कृपा करि सखया सुखशांती नांदवी जगती या । सर्वा सन्मती दे ॥ गुरूo॥ ५ ।

## पद २६ वे



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

दत्त सदनी जाऊ । आपण दत्त सदनी जाऊ । श्रीदत्ताची नयनमनोहर । मूर्ति आपण पाहू ॥ ध्रु०॥ पूजा अर्चा करूनी आरती । तीर्थ प्रसाद घेऊ ॥ १ ॥ अखंड करूनी गुरूसेवेला । जन्म मरण चुकवू ॥ २ ॥ श्रीगुरूरायाच्या वरदाने । दत्तस्वरूप होऊ ॥ ३ ॥ मिनी म्हणे या दत्तनामा । सारे मिळूनी गाऊ ॥ ४ ॥

### पद २७ वे

प्रसाद हा मज द्यावा देवा । सहवासा तुझिच घडावा ॥ ध्रु०॥

निशिदिनी तव मी नाम स्मरावे । विसर तुझा न पडावा ॥ १ ॥
हृदयमंदिरी तुवा बैसुनी । ज्ञान- योग मज द्यावा ॥ २ ॥
हरिभजनामृत निशिदिनी पाजुनी । जन्म मृत्यु चुकवावा ॥ ३ ॥
आत्मसुता प्रभु प्रसाद द्यावा । वियोग ना तव व्हावा ॥ ४ ।

### पद २८ वे

तुमचेनि प्रसादे धन्य झालो देवा । कीव माझी देवा आली तुम्हा ॥ ध्रु०॥ अनंत जन्मीचा आहे हो मी दोषी । माझ्या पापराशी असती बहुत ॥ १ ॥ तुझे नाम देवा गोड वाटे मज । सर्व पापे दग्ध होती जेणे ॥ २ ॥ पूर्व सुकृतेची सर्व फळा आली । लागली आवडी म्हणूनी तुझी ॥ ३ ॥ शास्त्रोक्त कर्मे नाही ठावे मज । भोळया भावे तूज भजतो मी ॥ ४ ॥ हीच माझी आस, पुरवावी देवा । जैसा आहे तैसा धरी पोटी ॥ ५ ॥

आत्मसुत म्हणे ऐकी ऐकी देवा । माझी लाज तुला आहे आता ॥ ६ ॥

1. अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त .
2. अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज़ त्रयस्त्रिंशत् कोटी देवतास्वरूप ब्रह्म हरिहरात्मक श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराज की जय .



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

3. श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीसद्गुरू श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज की जय.

4. श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीसद्गुरू ब्रह्मानंद सरस्वती स्वामी महाराज की जय.

वरिल नामगजराने पालखी संपते. नंतर उत्सवमूर्ती फिरून मंदिरात नेण्यात येते. आत घेण्यापूर्वी पुरूषसूक्त अभिषेक क रतात. तीर्थप्रसाद सर्वांना वाटण्यात येतो. यानंतर स्त्रिया आरत्या म्हणतात. त्या सुद्धा ठराविकच आहेत.



PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com